## प्रेस नोट दि. २३/०६/२०२२

# गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय यांची उल्लेखनीय कामगिरी

**जगतगुरु श्री. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे बंदोबस्तामध्ये गुन्हे शाखेचे वेगवेगळे ०४ पथक तयार करुन पालखी सोहळ्यात फिरणाऱ्या ७५ संशयित गुन्हेगारांवर सीआरपीसी कलम १०९ प्रमाणे कारवाई करुन दरोडा तसेच जबरी करणारे गुन्हेगार यांना रंगेहात पकडून त्यांचेकडून दाखल गुन्ह्यापैकी ०७ गुन्हे उघडीस त्यातील चोरीस गेलेले २,६०,०९६/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिणे हस्तगत करण्यात आलेले असून वारीमध्ये होणाऱ्या जबरी चोरीचे गुन्ह्यांना आळा घालण्यात यश आले आहे.**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये जगतगुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यामध्ये भावीक भक्ताचे गळ्यातील मंगळसुत्र/चैन चोरी, पाकीट मारी तसेच महिला छेडछाड करणाऱ्या टोळ्या परजिल्ह्यामधुन देहूगांव येथे येत असतात याबाबत मा.पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे , मा.अपर पोलीस आयुक्त श्री. संजय शिंदे , मा. पोलीस उप-आयुक्त श्री.काकासाहेब डोळे , मा. पोलीस उप-आयुक्त श्री.आनंद भोईटे , मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.प्रशांत अमृतकर यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रामदास इंगवले,गुन्हे शाखा युनिट ५, पिंपरी चिंचवड व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेश गायकवाड, गुन्हे शाखा, युनिट -२ यांचे मार्गदर्शनाखाली **१) भुरट्या चोऱ्या विरोधी पथक, २) मंगळसुत्र चोरी विरोधी पथक, ३) पाकीटमार चोरी विरोधी पथक, ४) महिला छेडछाड विरोधी पथक** अशी दिवसपाळी/रात्रपाळी करिता एकूण **०८ पथके** साध्या वेशात नेमण्यात आलेली होती.

मा.वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे व त्यांचे मागदर्शनाखाली वरिल पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना कारवाई करुन गोपनीय माहिती काढून गर्दीचे ठिकाणी आढळून आलेले एकूण **१४० संशयित पुरुष व महिला** यांना ताब्यात घेवून त्यापैकी **७५** व्यक्तींवर **सीआरपीसी कलम १०९ प्रमाणे** प्रतिबंधात्मक कारवाई करुन चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्याचा प्रयत्न केला आहे.

तसेच जगतगुरु संत तुकाराम पालखी सोहळ्यामध्ये गर्दीचा फायदा घेवून भाविक भक्तांचे **मंगळसुत्र चोरी करणारे, पाकीटमारी करणारे अहमदनगर, लातूर व बीड जिल्ह्यातील सराईत गुन्हेगांराच्या टोळ्यामधील** आरोपींना रंगेहाथ पकडून गुन्हे उघडकीस आणून त्यांचेकडून खालील गुन्ह्यात सोन्याचे दागिणे हस्तगत करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस **स्टेशन** | आरोपीचे **नाव व पत्ता** |
|---|---|---|
| १ | देहूरोड पोलीस स्टेशन गु.रं.न.४०३/२०२२ भादंवि क.३९५ | १) सुनील दत्तु मस्के, वय २० वर्षे, रा.पाथर्डी,अहमदनगर<br>२) विलास हिरामण धोत्रे, वय २५ वर्षे, रा.पाथर्डी,अहमदनगर<br>३) संतोष शहादेव म्हासळकर, वय २७ वर्षे रा. पाथर्डी, अहमदनगर<br>४) नागेश बारकू पवार, वय ३० वर्षे,रा. पाथर्डी, अहमदनगर<br>५) पुनम युवराज उपाध्ये, वय ३५ वर्षे, रा.देगलूर,नांदेड |
| २ | देहूरोड पोलीस स्टेशन गु.रं.न.४१०/२०२२ भादंवि क.३९५ | १) भगवान वसंत गायकवाड, वय २६ वर्षे,रा.खडकपुरा,बीड<br>२) रामकृष्ण बबन जाधव, वय ३४ वर्षे, रा.पिठ्ठी,निरगुडी,ता.पाटोदा जि.बीड<br>३) बाळू तुळशीराम जाधव, वय २८ वर्षे, रा.गांधीनगर, बीड<br>४) रामेश्वर अंबादास जाधव, वय २५ वर्षे रा.शिरापुर,ता. शिरुर कासार,बीड<br>५) माणिक दौलतराव जाधव,वय ३८ वर्षे, रा.बलभीमनगर ता.व जि.बीड |
| ३ | देहूरोड पोलीस स्टेशन गु.रं.न.४११/२०२२ भादंवि क.३९२,३४ | १) अंकुश बन्सी गायकवाड,वय ४१ वर्षे, रा.गांधीनगर,बीड<br>२) अनिवाश तानाजी गायकवाड, वय २१ वर्षे, माऊलीनगर, बीड<br>३) सखाराम छगन वाघमारे, वय ३२ वर्षे,रा.बहिरवाडी,बीड<br>४) रामेश्वर जालिंदर शेरकर, वय २४ वर्षे,रा.लक्ष्मीनगर,बीड |
| ४ | देहूरोड पोलीस स्टेशन गु.रं.न.४०१/२०२२ भादंवि क.३९२,३४ | १) जयश्री लक्ष्मण दांडेकर, वय ४५ वर्षे रा.चिखली,पुणे<br>२) रतनदादा धनवट, वय २५ वर्षे, रा.मोरेवस्ती चिखली,पुणे<br>३) पुनम युवराज उपाध्ये, वय ३५ वर्षे, रा.देगलूर,नांदेड |
| ५ | देहूरोड पोलीस स्टेशन गु.रं.न.३९३/२०२२ भादंवि क.३९२,३४ | १) सुनील दत्तु मस्के, वय २० वर्षे,रा.पाथर्डी,अहमदनगर<br>२) विलास हिरामण धोत्रे, वय २७ वर्षे, रा. पाथर्डी, अहमदनगर<br>३) संतोष शहादेव म्हासळकर, वय २७ वर्षे रा. पाथर्डी, अहमदनगर<br>४) नागेश बारकू पवार, वय ३० वर्षे,रा. पाथर्डी, अहमदनगर |

| | | |
|---|---|---|
| ६ | देहूरोड पोलीस स्टेशन गु.रं.न.३९७/२०२२ भादंवि क.३९२,३४ | १) मनिषा संजय गायकवाड, वय ५० वर्षे,रा.लाळेगांव,ता.जळकोट जि.लातूर |
| ७ | निगडी पोलीस स्टेशन गु.रं.न.४६९/२०२२ भादंवि क.३९२,३४ | १) तुषार हरिदास गायकवाड,वय ३१ वर्षे, रा.सध्या संजयनगर,फुगेवाडी,पुणे मुळ रा.पाथर्डी,अहमदनगर |

सदर गुन्हयामध्ये एकूण **२३ आरोपींना** रंगहात पकडण्यात आले आहे तसेच गुन्ह्यामध्ये २,६०,०९६/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिणे जप्त करण्यात आले आहे.

तसेच संशयित आरोपी चेक करत असताना **अकलुज पोलीस स्टेशन गु.र.नं.११७/२०१७ भादंवि क.३५४,३६३,३६६ पोक्सो अॅक्ट, अॅट्रासिटी अॅक्ट क.११,१२** मधील आरोपी नामे **आकाश उर्फ भैय्या चंद्रकांत पवार, वय – २५ वर्षे, रा. राऊतनगर, अकलूज जि.सोलापूर** हा मिळून आल्याने त्याचा अभिलेख तपासला असता तो सन २०१७ पासून कोर्टात हजर राहत नसल्याने **मा.जिल्हा व सत्र न्यायालय, माळशिरस** न्यायालयाचे त्याचे नावे निघालेले **एन.बी.डब्लू वॉरंट** प्रलंबित असल्याने त्यास ताब्यात घेवन पुढील कारवाईसाठी अकलुज पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

पालखी सोहळ्यादरम्यान देहूगाव इंद्रायणी नदी घाटावर महिलांचे लपून फोटो काढणारे परप्रांतीय **इसम नामे १) मुन्नाकुमार महतो, वय ३० वर्षे २) अनिल चौहान, वय २८ वर्षे, रा.गोपालगंज, बिहार** यांचेवर देखील प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे , मा. अपर पोलीस आयुक्त श्री. संजय शिंदे , मा.पोलीस उप-आयुक्त श्री. काकासाहेब डोळे , मा.पोलीस उप-आयुक्त श्री. आनंद भोईटे , मा.सहा.पोलीस आयुक्त श्री. प्रशांत अमृतकर, यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे व सुचनाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रामदास इंगवले, गुन्हे शाखा युनिट ५, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेश गायकवाड, गुन्हे शाखा, युनिट -२, यांचे मार्गदर्शनाखाली भुरट्या चोऱ्या विरोधी पथकाचे अधिकारी पोउपनि श्री.राहुल कोळी व पोउपनि श्री. सतेज जाधव व अंमलदार, मंगळसुत्र चोरी विरोधी पथकाचे अधिकारी श्री.राजन महाडीक व सपोनि श्री.बाबर , पाकीटमार चोरी विरोधी पथकातील अधिकारी पोउपनि श्री.गोसावी व श्री.गणेश रायकर, महिला छेडछाड विरोधी पथकातील अधिकारी मपोउपनि श्रीमती क्षीरसागर व मपोउपनि श्रीमती शेलार तसेच नमूद पथकातील अंमलदार यांनी केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
**पोलीस उप-आयुक्त, गुन्हे**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**